# शाळेचे विशेष उपक्रम

**दप्तराशिवाय शाळा :-**

२००४ ते आजपर्यंत म्हणजे २०१६ पर्यंत आम्ही दप्तराशिवाय शाळा चालिवत आहोत. विद्यार्थी शाळेत दप्तर आणतच नाहीत. कारण **Speak & Span** ला दप्तराची गरजच उरली नाही. सर्व अभ्यास शाळेतच स्वयं अध्ययनाद्वारे, वह्या, व्यवसाय पुस्तिकांशिवाय सुट्या पानांवर होतो. आपल्यासमोर आतापर्यंत निघालेल्या २००४ ते २०१६ वी चा उत्तीर्ण टक्केवारी तसेच गुणवंत विद्यार्थ्यांची टक्केवारीचा आलेख देत आहोत.

आम्हाला दिवसभरात फक्त दोन, कधी कधी तर एकच पाठ्यपुस्तक लागते, मग दप्तराचं ओझ अन् अभ्यासाचा बोझा पुर्णपणे हलका झाला. शाळेत शिक्षक-शिक्षिका शिकवत नाहीतच अन् तरीही विद्यार्थी शिकताहेत. मग प्रश्न असा उभा राहतो की शाळेत स्वयं अध्ययनाने शिकणार आहेत तर शाळा शिक्षकां शिवाय चालू शकेले छे! उलट या पध्दतीत शिक्षकांची जबाबदारी अजूनच वाढते. कारण शिक्षकांना जास्त प्रगल्भतेने प्रत्येक विद्यार्थ्यांची समस्या जाणून विद्यार्थीपरत्वे मार्ग सुचवावा लागेल. असे जरी असले तरी शाळेत शिक्षकांचा सहभाग अविभाज्य आहे. त्यांची भूमिका मार्गदर्शकाची आहे. बागेत झाडे आपोआप फुलतात म्हणून माळ्याची काहीच आवश्यक्ता नाही, असा नित्कर्ष कोणी काढू नये.

**ध्यान :-**

अध्यात्मिक शिक्षण (**Spiritual Education**) अभ्यासक्रमात हवच अशी कोठारी आयोगाची सूचना आमच्या शाळेत अमलात आणली. शाळेत विद्यार्थी रोज दिवसातून दोन वेळा १५-१५ मिनिट एकत्रित आनापान ध्यान करतात.

**ध्यानाचे फायदे :-**

भावनांसंबंधी, तणाव, काळजी, विध्वंसकता, व्यसन, भीतीवर ताबा, त्याचप्रमाणे विविध आजार :- मणक्यांसंबधीचे आजार (Spondylitis ), तीव्र डोकेदुखी (Migrane), अल्सर (Ulcer), मधुमेह (Diabetes), सांधेदुखी

(Arthritis), दमा (Asthama), Psoriasis ताब्यात राहतो.

**वाढ टक्केवारीची (% Excalation Programme) :-**

दोनदा शिकलं तर मार्क्स दुप्पट मिळतील ही एक चुकीची समजूत दूर करण्यासाठी आम्ही मागच्या वर्षीपासून वरील पध्दत सुरु केली, कारण आमचे विद्यार्थी संपूर्ण अभ्यास शाळेतच स्वतः करतात. पण समाजाच्या शिकवणी वर्गाच्या संस्कृतीमुळे आपल्या पाल्याला शिकवणीवर्ग लावले नाही तर तो इतरांपेक्षा मागे पडेल या भीतीपोटी पालक शिकवणीवर्गाच्या शोधात असतात. त्यावर आम्ही उपाय शोधला कारण शाळेतच सर्व अभ्यास होतो. मग अजून शिकवणी का ? असे वारंवार विचारुन सुध्दा पालकांचं समाधान होतच नव्हतं.

शिकवणीला पर्याय दिला तो 'टक्केवारीची वाढ' या उपक्रमाने, कारण या तत्सम वर्गात कोणीच शिकवीत नाही. सांगा कंस म्हणू याला शिकवणी वर्ग ? फक्त रोज-रोज परीक्षा देऊन लिखाणातल्या किरकोळ चुका दुरुस्त करायला आमचे विद्यार्थी शिकले. त्यांना झेपेल तेवढाच पण त्यांच्या गतीप्रमाणे 'लक्ष' ठरवुन अभ्यास सुरु केला. ३-४ दिवस रोज रोज तीच परीक्षा पुन्हा पुन्हा दिली. दिवसागणिक गुणांमध्ये वाढ झाली. आत्मविश्वास दुणावला व आनंदात परिवर्तीत झाला.

विद्यार्थी जास्तवेळ शाळेतच असल्यामुळे पालकांचा अभ्यास कर, अभ्यास कर हा ससेमिरा सुटला अन् पालकांनी पुन्हा एकदा दुजोरा दिला, हो, आता त्याला / तिला अभ्यासाची गोडी लागली. इतकेच नव्हे तर मुलाला स्वतःहून अभ्यास करतांना पाहून पालक चकितच झालेत.

**Home Tuitions / Tutors ला पर्याय (एकास एक) :-**

स्वामी विवेकानंदाच्या तत्वाला अनुसरुन **'No one can teach anyone'** प्रमाणे आम्ही सुध्दा शिकवण्याचा तसेच शिकवणीच्या विरुध्दच आहोत.

आज कुठल्याही वर्गात जाऊन विद्यार्थ्यांना विचारा तुम्हाला शिक्षक व्हायला आवडेल का ? तर भलामोठा नकार व अतोनात अनिच्छा दिसते. शिक्षकाचा पेशा व्यवसायाच्या (**Career**) प्रथम क्रमांकावर कधी येणार ?

याचा बरेच दिवसांपासून विचार सुरु होता. शाळेतच विद्यार्थ्यांना स्वतंत्र शिक्षक देता येईल असा विचार पक्का झाला आणि जाणवलं **home tuition** ना नक्कीच हा पर्याय ठरु शकेल. यात विद्यार्थ्यांच्या कुवतीनुसार शिक्षक फक्त एका विद्यार्थ्यावर सगळं लक्ष केंद्रित करुन आवश्यक तो विकास, कौशल्य दाखवू शकेल. पण हा कार्यक्रम राबवतांना आम्हाला शिक्षकांचा भलामोठा ताफाच लागेल. तेव्हा आमच्या भाश्वती मॅडम सहज बोलून गेल्या. या व्यवस्थेमुळे बेरोजगारांचा फार मोठा प्रश्न सुटेल व त्यांना सन्माननीय नोकरी उपलब्ध होईल. मगं वाटलं असं झालं तर खूप काही साध्य होईल. तेव्हा एकास एक हा कार्यक्रम पण आम्ही सुरु करत आहोत.

**छोटे वर्ग (Small Classrooms) :-**

काल काही १० वी चे विद्यार्थी माझ्याकडे आलेत व म्हणालेत, मॅडम, जरा या बंडखोर, अभ्यासात लक्ष न देणाऱ्या विद्यार्थ्यांना आमच्यापासून दूर करा ना, म्हणजे आम्ही अभ्यासात जरा जास्त लक्ष घालू, तेव्हा एक गट जर वर्षभर छोट्या वर्गात (५ विद्यार्थी) लक्ष देऊन अभ्यास करेल तर खंर स्वर्गीय सुख शाळेला, शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना पण मिळेल. तेव्हा ५ विद्यार्थ्यांमागे एक शिक्षक हा पर्याय पण आम्ही देणार आहोत,

तेव्हा दप्तराशिवाय शाळा असलेली अशी **Spick & Span** ही नवीन उपक्रमांसह.

वाढ टक्केवारीची (**% Excalation Programme**)

एकास एक (१:१)

छोटे वर्ग (**Small Classrooms**)

आपल्या समोर येत आहे. स्विकाराल, सहकार्य कराल या अपेक्षेसह.

स्पिक ॲन्ड स्पॅन कॉन्व्हेट
**डॉ.विणा सावजी**
९४२१८०७८५८